 नियमीत फौजदारी खटला क्र.११/२०२४
CNR No. MHSI03-000018-2024

**नि.क्र.२५**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०१ याची जबानी –**
**मी याद्वारे असे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :**

माझे नांव : नंदकुमार चंद्रकांत गोसावी
वय सुमारे : ५३ वर्षे, धंदा – नोकरी सहा.पोलीस उपनिरीक्षक नेमणूक सिंधुदुर्ग नगरी पोलीस ठाणे ब.नं.९००,
निवासस्थान : राहा. ओरोस ता.कुडाळ, जि.सिंधुदर्ग

-----------------------------------

**फिर्यादी पक्षातर्फे सरतपास वकील सौ. एस.वाय.गोबाडे**

**०१.** दिनांक १३/०३/२०२४ ते १४/०३/२०२४ या कालावधीत मी सिंधुदुर्ग नगरी पोलीस ठाण्यात चालक म्हणून कार्यरत होतो. त्यादिवशी मी स्वतः माझ्या सोबत पोलीस कॉन्स्टेबल मुंडे रात्र गस्ती करीता रात्री २० .०० ते सकाळी ८.०० वाजेपर्यत होतो. आम्ही शासकीय वाहन सुमो क्र.एमएच ०७–जी २२०७ ने गस्त घालत होतो. त्यावेळी आम्हांला पोलीस ठाणे अंमलदार यांनी फोनव्दारे कळविले की , श्रीकृष्ण खंदारे कसाल , बालमवाडी यांचे गळयातील चेन स्वामी समर्थ मठाचे जवळ पायवाटेवर पहाटे ४ .३० दरम्याने खेचण्याचा प्रयत्न केला आहे असे कळविले. त्यावेळी त्यांनी आम्हांला असेही सांगीतले की दोन इसम होते. तुम्ही जावून शोध घ्या. त्यानंतर आम्ही कसाल बालमवाडी येथे स्वामी समर्थ मठाजवळ गेलो त्यावेळी श्रीकृष्ण खंदारे उपस्थीत होते. त्यांना आम्ही विचारणा केली असता, श्रीकृष्ण खंदारे यांनी सांगीतले की, ते पुजेला स्वामी समर्थ मठात येत असताना दोन अनोळखी इसम येवून माझ्या डोळयात मिरचीपुड फेकली व गळयातील चेन खेचण्याचा प्रयत्न केला व ते कणकवलीच्या दिशेने पळून गेले. त्यानंतर आम्ही कसाल एसटी स्टॅड व कसाल बाजारपेठ येथे तपास करुन तेथून कणकवलीच्या दिशेने टोलनाक्याकडे जाण्यास निघालो असता आम्हांला रस्त्यांत टोल नाक्याजवळ दोन इसम चालत जाताना दिसले . त्यांचा आम्हांला संशय आल्याने आम्ही थांबवून त्यांच्या नावागावाची चौकशी केली असता त्यांपैकी एका इसमाने त्याचे नाव श्रीकांत कुम्मारी व दुसरा इसमाने त्याचे विकास मुल्लीनर असे सांगीतले. त्यानंतर आम्ही त्यांना गाडीत बसवुन घेतले व स्वामी समर्थ मठ कसाल बालमवाडी येथे घेवून आलो. त्यावेळी आंम्ही फिर्यादी श्रीकृष्ण खंदारे यांना विचारले की , तुमच्या डोळयात मिरचीपुड टाकून चेन खेचनारे हेच दोन इसम आहेत का ते ओळखून सांगा त्यावेळी श्रीकृष्ण खंदारे यांनी सदर दोन्ही इसमांना ओळखून सांगीतले की , सदर इसमांनीच त्यांच्या डोळयात मिरचीपुड टाकून गळयातील चेन खेचण्याचा प्रयत्न केला आहे.

**०२.** त्यानंतर आम्ही दोन्ही इसमांना पोलीस स्टेशन सिंधुदुर्ग नगरी येथे घेवून

आलो. त्यावेळी श्रीकांत कुम्मारी व विकास मुल्लीनर यांना घटनेबाबत अधिक विचारपूस केली असता त्यांनी आम्हांला सांगीतले की, संतोष बिरादार यांच्या सांगण्यावरुन आम्ही ते दोघेजण खैरेवाडी येथे स्वामी समर्थ मठाचे जवळ आले होते . त्यानंतर आम्ही आरोपी यांना गाडीत बसवून संतोष बिरादार यांचे खैरेवाडी येथील ओट्रा रेसीडन्सी मध्ये असलेल्या रुमवर श्रीकांत कुम्मारी व विकास मुल्लीनर यांचे सांगण्याप्रमाणे गेलो. त्यानंतर आम्ही संतोष बिरादार याला संशयीत म्हणून पकडून त्याला सुध्दा पोलीस व्हॅनमध्ये बसवले व सिंधुदुर्ग नगरी पोलीस ठाण्यात घेवून आलो. तपासी अधिकारी यांनी माझे तपास टिपन नोंदविले होते. आम्ही ज्या वाहनाने रात्र पहारा गस्त घालत होतो त्याचा लॉग बुक उतारा मी तपासी अधिकारी यांना दिलेला आहे. सदर लॉग बुक चा उतारा आता मला दाखविला . त्यावर माझे नाव नमूद आहे. त्यात लिहीलेला मजकूर बरोबर आहे. त्यावर पोकॉ मुंडे यांची सही आहे. सदरची सही मी ओळखतो कारण सदरची सही माझ्या समक्ष केलेली आहे . सदर लॉग बुक उता–यास **नि.पी–१** देण्यात आले. आरोपी यांना पाहील्यास ओळखू शकतो. आजरोजी आरोपी क्र.१ श्रीकांत कुम्मारी न्यायालयात हजर आहे. आरोपी क्र.२ संतोष बिरादार हा न्यायलयात हजर नाही. विकास मुल्लीनर यास पाहील्यास मी ओळखू शकतो.

**सरतपास पूर्ण.**

**<u>आरोपी क्र.१ तर्फे उलटतपास सन्माननीय वकील श्री.खुने यांचे मार्फत–</u>**

**०३.** ठाणे प्रभारी अधिकारी यांनी फिर्यादी श्रीकृष्ण खंदारे यांच्या आलेल्या फोनबाबतची नोंद ठाणे दैनंदिनीला घेतली होती . त्यानंतर ठाणे अंमलदार यांनी मला फोन केला होता. साधारणपणे मला सकाळी ४ .३० च्या दरम्याने फोन आला होता . त्यावेळी आम्ही पडवे गावाच्या जवळ होतो. फोन आल्यानंतर पडवे गावातून श्रीकृष्ण खंदारे यांचे कडे जाण्यासाठी व तेथून कणकवलीच्या दिशेने गेल्यानंतर आरोपी क्र.१ व विकास मुल्लीनर यांना पकडून पोलीस स्टेशनला आणण्याकरीता व तेथून ओट्रा रेसीडन्सी येथे जावून आरोपी क्र . २ यास पोलीस स्टेशन येथे आणण्याकरीता आम्हांला सकाळचे ७ .०० वाजले होते . आम्हांला आरोपी क्र.१ व विकास मुल्लीनर याच्या ताब्यात काहीही मिळून आलेले नव्हते . आरोपी क्र.१ व विकास मुल्लीनर हे दोघे रस्त्याने जात असताना त्यांचा आम्हाला संशय आला कारण ते कावरेबावरे बघायला लागले. मी माझ्या तपास टिपणामध्ये आरोपी क्र.१ व विकास मुल्लीनर हे कावरेबावरे बघायला लागले त्यामुळे आम्हाला त्यांचा संशय आला असे मी तपासी अधिकारी यांना जबाब देताना सांगीतले नव्हते . सदरची बाब मी तपास टिपण नोंदविताना पोलीसांना का सांगीतली नाही यांचे कारण सांगू शकत नाही . आरोपी क्र.१ व विकास मुल्लीनर अंदाजे सकाळी ४ .४५ वाजताच्या दरम्याने ओसरगाव टोलनाक्याजवळ मिळून आले होते. हे म्हणणे खरे आहे की , सकाळी ४.३० ते ५.०० ही सकाळची वेळ

असल्याने लोक मार्निंग वॉकसाठी जात असतात. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.१ व विकास मुल्लीनर हे सुध्दा त्यादिवशी मार्निंग वॉक करीत होते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.१ व विकास मुल्लीनर यांना मी विनाकारण बळीचा बकरा बनवून पकडले आहे.

**०४.** मी तपासी अधिकारी यांना जबाब देताना आरोपी श्रीकांत कुम्मारी व विधी संघर्ष ग्रस्त बालक विकास मुल्लीनर यांनी त्यांना आरोपी क्र .२ संतोष बिरादार यांने स्वामी समर्थ मठाच्या जवळ कसाल बालमवाडी येथे बोलावले होते ही बाब सांगीतलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगतो त्याप्रमाणे कोणतीही घटना घडलेली नाही. फिर्यादी खंदारे यांनी कणकवली च्या दिशेन दोन इसम गेले एवढेच आम्हांला सांगीतले होते. संशयीताचे वर्णन फिर्यादी यांनी आम्हांला सांगीतले नव्हते.

**आरोपी क्र. १ तर्फे उलटतपास– पूर्ण.**
**<u>फेरतपास</u>** – नाही.

**<u>आरोपी क्र.२ तर्फे उलटतपास सन्माननीय वकील श्रीम. तेंडोलकर यांचे मार्फत</u>–**

**०५.** स्वामीसमर्थ मठ ते ओसरगाव टोल नाका यामध्ये सात ते आठ किमी अंतर आहे. त्याठिकाणी वाहनाने जाण्यासाठी १५ ते २० मिनीटे लागतात. हे म्हणणे खरे आहे की, स्वामी समर्थ मठ ते ओसरगाव टोल नाका येथे पायी चालत जाण्यासाठी अंदाजे एक ते दीड तास लागतो. हे म्हणणे खरे आहे की, ओसरगाव टोल नाका पासून सिंधुदुर्ग नगरी पोलीस ठाणे येथे येण्यासाठी अंदाजे वीस ते पंचवीस मिनीटे लागतात. सिंधुदुर्ग नगरी पोलीस ठाणे येथून ओट्रा रेसीडन्सी खैरवाडी येथे जाण्यास १० मिनीटे लागतात. हे म्हणणे खरे नाही की, संतोष बिरादार यांना आणण्यासाठी मी स्वतः गेलो नव्हतो. हे म्हणणे खरे आहे की, सर्वसामान्य लोक पोलीसांना घाबरतात. हे म्हणणे खरे नाही की, ज्या संशयीत व्यक्तीना आम्ही पकडले त्यांनी आम्हांला संतोष बिरादार याचे नाव सांगीतले हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, संतोष बिरादार याचे नाव प्रस्तुत गुन्हयात खोटे गोवण्यात आले आहे.

**आरोपी क्र. २ तर्फे उलटतपास– पूर्ण.**

**<u>फेरतपास</u>** – नाही.

श्रवणोत्तर स्विकत,
TIDKE AMARDEEP DADARAO
Digitally signed by TIDKE AMARDEEP DADARAO
Date: 2025.02.05 17:17:04 +0530

ठिकाण :– ओरोस	( अ.डा.तिडके )
दिनांक :–०४/०२/२०२५.	अति.मुख्य न्यायदंडाधिकारी,
सिंधुदुर्ग–ओरोस.